<u>अर्थसंकल्पिय अनुदान सन २०१५-२०१६</u>

<u>मागणी क्र. एल -५</u>, ३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (दोन) गौण खनिजावरील स्वामित्वधनाच्या मिळकतीतून अभिहस्तांकित रकमा देण्यासाठी ग्रामपंचायतींना सहाय्य (३६०४०३१६)

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः अर्थसं-२०१५ /प्र.क्र.२० /वित्त-२

बांधकाम भवन इमारत- २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
तारीख: १९ जानेवारी, २०१६

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय क्रमांकः ग्रामविकास विभाग, अर्थसं-२०१५ /प्र.क्र.२० /वित्त-२ दि. १४ मे, २०१५

शासन निर्णय-

गौण खनिजांवरील स्वामित्वधनाच्या मिळकतीतून अभिहस्तांकित रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतींना सहाय्य (३६०४०३१६)या लेखाशिर्षाखाली सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरीता रु.१७,०८,८५,०००/- (अक्षरी रुपये सतरा कोटी आठ लक्ष पंच्याऐंशी हजार फक्त) एवढी तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी ७० % च्या मर्यादेत रु.११,९६,१९,०००/- इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे.

१. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३ दि.१२/०१/२०१६ च्या परिपत्रकान्वये अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ८५ % च्या मर्यादेत वितरणास मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी १५ %च्या मर्यादेत **रु.२,५६,३२,७५०/-(अक्षरी रुपये दोन कोटी छप्पन लक्ष बत्तीस हजार सातशे पन्नास फक्त)** इतके अनुदान अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली वर (BEAMS) उपलब्ध करून देण्यास व वितरित करण्यास वित्त विभागाच्या सदर परिपत्रकान्वये अनुमती देण्यात आली आहे. <u>सदर तरतूद (सर्व) जिल्हाधिकारी यांच्याकडे</u> या शासन निर्णयान्वये सुपूर्द करण्यांत येत आहे.

२. जिल्हाधिकारी **<u>यांना विनंती करण्यात येते की, या वर्षीची तरतूद ही गौण खनिजावरील स्वामित्व धनाच्या मिळकतीतून प्रत्यक्ष कोषागारात जमा झालेल्या सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षातील वसूलीच्या आधारे संबंधित ग्राम पंचायतींना तहसिलदार यांचेमार्फत अनुदानाचे वाटप करण्यात यावे</u>**.

आणि वाटप केलेल्या त्यांच्या आदेशाच्या प्रती शासनाकडे पाठवाव्यात.**परंतू या योजनेपोटी ग्रामपंचायतींना देय असलेली अनुदानाची रक्कम अधिकतम रु. १ लाखापेक्षा अधिक असणार नाही.** जिल्हाधिकारी यांनी शासन निर्णयात मंजूर केलेल्या तरतूदीपेक्षा रक्कम जादा खर्च होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

३. गौण खनिजावरील स्वामित्व धनाच्या मिळकतीतून २०१४-२०१५ या वर्षामध्ये प्रत्यक्षात किती रक्कम जिल्हाधिका-यांकडून राज्य शासनाच्या खाती जमा झालेली आहे व किती रक्कम ग्रामपंचायतींना देय आहे, याबाबतची स्पष्ट माहिती जिल्हाधिका-यांनी तत्परतेने शासनास कळवावी.

४. गाववार याद्यानुसार देय होणा-या अनुदानाचे आदेश गाववार याद्यांसह संबंधित तहसिलदार यांनी काढावेत व गाववार याद्यासह रक्कम कोषागारातून काढून गट विकास अधिका-यांकडे पाठवावी आणि गट विकास अधिकारी यांनी गाववार याद्यानुसार सदर अनुदानाची रक्कम धनादेशाव्दारे संबंधित ग्रामपंचायतींना द्यावी.

५. खर्चाचा मेळ घालण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवावीत व विभागीय आयुक्तांनी मंजूर रक्कमेच्या कोषागारातून अदा केल्या गेलेल्या मासिक खर्चाचा महालेखापाल, महाराष्ट्र १ व २ अनुक्रमे मुंबई व नागपूर यांच्या कार्यालयाशी ताळमेळ घालावा व त्याप्रमाणे शासनास कळवावे.

६. मंजूर करण्यात आलेल्या अनुदानांवरील खर्च मागणी क्र. एल ५ लेखाशिर्ष- ३६०४- स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे २०० इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१) (०२)गौणखनिजावरील स्वामित्वधनाच्या मिळकतीतून अभिहस्तांकित रक्कमा देण्यासाठी ग्राम पंचायतींना सहाय्य (३६०४०३१६) (दत्तमत) (योजनेतर) ५०इतर खर्च या लेखाशिर्षाखाली टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात केलेल्या मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानाच्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

७. हे अनुदान शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्देशित केलेल्या विहित अटी व शर्तीच्या अधीन राहील. तसेच वितरित निधीच्या खर्चाचा तपशील शासनास प्रत्येक महिन्याच्या शेवटी सादर करावा. तसेच सदर वितरीत केलेला निधी अखर्चीत राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहिल.

८. हा शासन निर्णय वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३ दि.१२/०१/२०१६ मधील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११९११३०२६३४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=241eb93ab449def8114b5fbff2ea51ab0f16e0092f0102aa9502d0457228dd65, cn=Pandurang Rawaji Khotare
Date: 2016.01.19 13:10:01 +05'30'

(पां.रा.खोटरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखापरिक्षा) (५ जादा प्रतीसह)
२) महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)(५ जादा प्रतीसह)
३) महालेखापाल , महाराष्ट्र -२, नागपूर (लेखा परिक्षा) (५ जादा प्रतीसह)
४) महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता) (५ जादा प्रतीसह)
५) विभागीय आयुक्त (सर्व)
६) जिल्हाधिकारी (सर्व)
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८) अध्यक्ष, जिल्हा परिषद(सर्व)
९) उप मुख्यलेखापरिक्षा,स्थानिकनिधीलेखा,कोकण(वाशी /पुणे/ नाशिक/ अमरावती / औरंगाबाद/नागपूर)
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई
१२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३) वित्त विभाग, (व्यय -१५) (अर्थसंकल्प -१७)
१४) कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग (का.क्र. वित्त-१, वित्त-७, वित्त-८)
१५) निवड नस्ती का.क्र. वित्त-२ ग्राम विकास व जलसंधारण विभाग

विवरणपत्र

शासन निर्णय क्र. अर्थसं.२०१५/प्र.क्र.२० /वित्त-२, दिनांक १९ जानेवारी, २०१६ चे विवरणपत्र मागणी क्र. एल -५,लेखाशिर्ष ३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१) (०२) गौणखनिजावरील स्वामित्वाधनाच्या मिळकतीतून अभिहस्तांकीत रक्कमा देण्यासाठी ग्राम पंचायतीना सहाय्य (३६०४०३१६) (दत्तमत)५० इतर खर्च

(रक्कम /हजारात)

अ.क्र.	जिल्हा परिषद	या शासन निर्णयान्वये वितरित करण्यांत येत असलेले अनुदान	
१	ठाणे	५६५	(रुपये पाच लक्ष पासष्ठ हजार फक्त)
२	रायगड	१०३४	(रुपये दहा लक्ष चौतीस हजार फक्त)
३	रत्नागिरी	९६४	(रुपये नऊ लक्ष चौसष्ठ हजार फक्त)
४	सिंधूदुर्ग	७५०	(रुपये सात लक्ष पन्नास हजार फक्त)
५	नाशिक	११०५	(रुपये अकरा लक्ष पाच हजार फक्त)
६	धुळे	६८०	(रुपये सहा लक्ष ऐंशी हजार फक्त)
७	नंदूरबार	४६५	(रुपये चार लक्ष पासष्ठ हजार फक्त)
८	जळगांव	१२७०	(रुपये बारा लक्ष सत्तर हजार फक्त)
९	अहमदनगर	४१५	(रुपये चार लक्ष पंधरा हजार फक्त)
१०	पुणे	७३०	(रुपये सात लक्ष तीस हजार फक्त)
११	सातारा	७९	(रुपये एकोणऐंशी हजार फक्त)
१२	सांगली	२९८	(रुपये दोन लक्ष अठ्ठयाण्णव हजार फक्त)
१३	सोलापूर	५६८	रुपये पाच लक्ष अडूसष्ठ हजार फक्त)
१४	कोल्हापूर	२०४	(रुपये दोन लक्ष चार हजार फक्त)
१५	औरंगाबाद	४५८	(रुपये चार लक्ष अठ्ठावन्न हजार फक्त)
१६	जालना	४१४	(रुपये चार लक्ष चौदा हजार फक्त)
१७	परभणी	३८१	(रुपये तीन लक्ष ऐक्याऐंशी हजार फक्त)
१८	हिंगोली	३९५	(रुपये तीन लक्ष पंच्याण्णव हजार फक्त)
१९	बीड	१३५	(रुपये एक लक्ष पस्तीस हजार फक्त)
२०	नांदेड	१२१८	(रुपये बारा लक्ष अठरा हजार फक्त)
२१	उस्मानाबाद	५४८	(रुपये पाच लक्ष अठ्ठेचाळीस हजार फक्त)

अ.क्र.	जिल्हा परिषद	या शासन निर्णयान्वये वितरित करण्यांत येत असलेले अनुदान	
२२	लातूर	३६९	(रुपये तीन लक्ष एकोणसत्तर हजार फक्त)
२३	बुलढाणा	१२४८	(रुपये बारा लक्ष अठ्ठेचाळीस हजार फक्त)
२४	अकोला	७५०	(रुपये सात लक्ष पन्नास हजार फक्त)
२५	वाशिम	६४०	(रुपये सहा लक्ष चाळीस हजार फक्त)
२६	अमरावती	११४६	(रुपये अकरा लक्ष शेहचाळीस हजार फक्त)
२७	यवतमाळ	९१९	(रुपये नऊ लक्ष एकोणीस हजार फक्त)
२८	वर्धा	१४७०	(रुपये चौदा लक्ष सत्तर हजार फक्त)
२९	नागपूर	१६४४	(रुपये सोळा लक्ष चव्वेचाळीस हजार फक्त)
३०	भंडारा	१२००	(रुपये बारा लक्ष फक्त)
३१	गोंदिया	२५५०	(रुपये पंचवीस लक्ष पन्नास हजार फक्त)
३२	चंद्रपूर	६८६	(रुपये सहा लक्ष शहाऐंशी हजार फक्त)
३३	गडचिरोली	३३५	(रुपये तीन लक्ष पस्तीस हजार फक्त)
	एकूण	२५६३३	**(रुपये दोन कोटी छप्पन लक्ष तेहतीस हजार फक्त)**

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=241eb93ab449def8114b5fbff2ea51ab0f16e0092f0102aa9502d0457228dd65, cn=Pandurang Rawaji Khotare
Date: 2016.01.19 13:10:42 +05'30'

(पां.रा. खोटरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन